"महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य" योजनेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेस निधी वितरीत करण्याबाबत. (हुडकेश्वर खडीकरण-डांबरीकरण)

<u>सन २०१५-१६ साठी लेखाशिर्ष (२२१७ ९४८३) खाली रक्कम रू. ५.९२ कोटी (प्रथम हप्ता).</u>

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६०/नवि-१६

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :-४ फेब्रुवारी, २०१६

<u>वाचा :-</u> (१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.२४/नवि-१६, दिनांक २७ जून,२०१२.

(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. जीईएन-२००८/प्र.क्र.०८/नवि-१६, दिनांक २९ ऑगस्ट, २००८.

(३) जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-१२/एमयुएन-३/कावि ८३५/२०१५, दिनांक १ ऑगस्ट,२०१५.

(४) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६०/नवि-१६, दिनांक १२ आक्टोंबर, २०१५.

(५) आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांचे पत्र क्र. एमसी/२६१/२०१५ दिनांक ३१ डिसेंबर,२०१५.

(६) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१५ / प्र.क्र.८५ /अर्थ-३, दिनांक १७ एप्रिल,२०१५.

(७) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ३४/कोषा. प्र.शा.५ दिनांक २४ जुलै,२०१५.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील महानगरपालिकांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य देण्यात येते. सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत.महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. संदर्भाधीन क्र. (३) येथील जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या प्रस्तावास अनुसरून संदर्भाधीन क्र. (४) येथील शासन पत्रान्वये अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरून संदर्भाधीन क्र (५) अन्वये शासनास अहवाल प्राप्त झाला आहे.संदर्भाधीन क्र. (६) व (७) येथील वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार "महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ क्षेत्रातील हुडकेश्वर खडीकरण-डांबरीकरण कामांकरीता "अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर" निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या रक्कम रु. १४,७९,२५,४७१/- (अक्षरी रक्कम रुपये चौदा कोटी एकोणऐंशी लक्ष पंचवीस हजार चारशे एक्काहत्तर मात्र) प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या हिस्स्याचा प्रथम हप्ता म्हणून रक्कम रु.५,९१,७०,१८८/- (अक्षरी रक्कम रुपये पाच कोटी एक्क्यान्नव लक्ष सत्तर हजार एकशे अठ्ठ्याऐंशी मात्र) इतका निधी नागपूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ क्षेत्रातील हुडकेश्वर खडीकरण-डांबरीकरण कामांकरीता वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा ८०% हिस्सा रक्कम रू.११,८३,४०,३७७/- (अक्षरी रक्कम रुपये अकरा कोटी त्र्याऐंशी लक्ष चाळईस हजार तीनशे सत्त्यात्तर मात्र) राज्य शासनाचा व २०% हिस्सा रक्कम रू.२,९५,८५,०९४/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी पंच्यान्नव लक्ष पंच्याऐंशी हजार चौ-यान्नव मात्र) नागपूर महानगरपालिकेचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व तदनंतरच सदरचा निधी आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात यावा.

३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयामधील (२) (iii) च्या तरतूदीनुसार राज्य शासन हिस्स्याच्या प्रथम हप्त्याच्या प्रमाणात नागपूर महानगरपालिकेने त्यांच्या हिस्स्याचा निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.याबाबतची खातरजमा जिल्हाधिकारी, नागपूर यांनी करावी.

४. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा संबधित महानगरपालिका राहील.

५. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

६. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

७. <u>जिल्हाधिकारी,नागपूर यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना “ई-निविदा” कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. “ई-निविदा” कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

८. <u>कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

९. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात नागपूर महानगरपालिकेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, नागपूर यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

१०. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

११. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे नागपूर महानगरपालिकेस वितरण करण्यासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांना नियंत्रक अधिकारी तसेच, जिल्हा प्रशासन अधिकारी, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे नियंत्रक अधिकारी

म्हणून वर्ग करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी आहरीत करून सदरच्या कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१२. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता झाल्यानंतर व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सदरचा निधी आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात यावा.

१३. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागपूर महानगरपालिकेस या लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी ७५% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१४. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी.असे गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

१५. या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबित असल्यास निधी आहरीत करू नये.असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

१६. आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०१७ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१७. निधी वितरीत करण्यापूर्वी नागपूर महानगरपालिकेकडून राज्य शासनास येणे असणा-या रकमांचा आढावा जिल्हाधिकारी, नागपूर यांनी घ्यावा व अशा रकमा वसूल करण्याबाबत आहरण व संवितरण अधिका-यास सूचित करावे.शासनास अशा येणे असणा-या रकमा वसूल करूनच उर्वरित निधी नागपूर महानगरपालिकेस वितरीत करावा व वसूल केलेल्या रकमा शासनाच्या योग्य लेख्याखाली जमा करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिका-याने करावी.अशा कपात करण्यात आलेल्या रकमांमुळे प्रकल्प अपूर्ण राहणार नाही याची दक्षता घेण्याबरोबरच, अशी कपात केलेली रक्कम प्रकल्प पुर्ततेसाठी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी नागपूर महानगरपालिकेची राहील.

१८. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता/तांत्रिक मान्यता देण्यात आल्याची खातरजमा करावी. त्याचप्रमाणे वितरीत करण्यात येणारा निधी ठेव बांधकामाचे स्वरूपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करू नये.

१९. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागपूर महानगरपालिकेकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ अन्वये कार्यवाही करावी.

२०. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १७ एप्रिल,२०१५ मधील सोबतच्या परिशिष्टाच्या अ.क्र. (९) मधील तपासणी सूचीतील अ.क्र. (५),(६),(७),(८) व (९) तसेच, शासन परिपत्रकामधील परिच्छेद (७) ते (१८) पैकी परिच्छेद क्र. (७),(८),(९),(१२),(१३),(१५), (१६) व (१८) लागू होत नाहीत.तसेच, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्र.शा.५ दिनांक २४ जुलै,२०१५ च्या परिच्छेद (अ) मधील अ.क्र. (६),(८),(९) व (१०) लागू होत नाहीत.उर्वरीत बाबींची उपरोक्त परिच्छेदांनुसार पुर्तता करण्यात आली आहे.

२१. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (६४) हद्दवाढ झालेल्या महानगरपालिकांना नव्याने समाविष्ट क्षेत्रात नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य, (२२१७ ९४८३), ३१, सहाय्यक अनुदान, या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२२. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १७ एप्रिल,२०१५ नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

२३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१७२३०२६८२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Shankar Kumbhar

Digitally signed by Vivek Shankar Kumbhar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=UNDER SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ef935067970760fbaec2fa421af2eac23d3b8737b990883be0d8ef292ba28a2f, serialNumber=5e3716fd0fe61ee87305882bc35ee7e757293849e74351e2ab33e4eb40bfb646, cn=Vivek Shankar Kumbhar
Date: 2016.02.04 17:22:48 +05'30'

(विवेक कुंभार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
३. विभागीय आयुक्त, नागपूर
४. जिल्हाधिकारी, नागपूर
५. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर
६. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,

९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
१३. जिल्हा प्रशासन अधिकारी, नागपूर
१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.